

रघुराज मेटकरी

या महाराष्ट्राच्या मराठी मातीत जन्मलेले, आणि या समाजाला जाग यावी, या समाजातील निरक्षर, अंधश्रद्धेला कवटाळून बसलेले, व्यसनाने घरपण हरवलेले, कर्जबाजारी लोक यांना सुखाचे दिवस भेटावेत यासाठी रात्रंदिवस किर्तने, प्रवचने देऊन माणसाचे जग सुखी, आनंदी व्हावे म्हणून झटणारे गोरगरीब, आदिवासी, भटक्या गावाबाहेर पालात राहाणाऱ्या लोकांच्या मुलांना संत गाडगे महाराजांच्या नावाने अनेक अनाथ आश्रमशाळा काढून त्यांना शिक्षण देऊन समाजात उच्चस्थान मिळवून देणारे, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन तुरुंगवास भोगणारे, आणि मी माझ्या मातृभूमीचे काम केले ते पेन्शनसाठी नाही म्हणून स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शन नाकारणारे, संत गाडगे महाराजांचे आवडते शिष्य स्वातंत्र्यसेनानी जिजाबा मोहिते पाटील-सोहोलीकर महाराज या राष्ट्रीय कीर्तनकारांची साहित्यिक रघुराज मेटकरी यांनी लिहिलेली अत्यंत रसाळ, उत्कंठा वाढविणारी ही चरित्रात्मक बाल कादंबरी प्रत्येकाने वाचावी अशी आशा आहे. मुलांच्यासाठी तर हा संस्कारक्षम अमूल्य ठेवा आहे.

**प्रा. इंद्रजित भालेराव**
ज्येष्ठ साहित्यिक (परभणी)

ISBN 978-93-94617-16-2

राष्ट्रीय कीर्तनकार, स्वातंत्र्यसेनानी

# जिजाबा पाटील–सोहोलीकर

रघुराज मेटकरी

तेजश्री प्रकाशन

गोड बोलणे, सर्वांची मने जिंकणे आणि सर्वांनी सद्मार्गाला लागावे ही प्रार्थना परमेश्वराकडे करणारे जिजाबा महाराज मोठे संत, अवलिया होते.

परमेश्वराबद्दल ते सांगायचे, ''प्रत्येक माणसाला आत्मा आहे. परंतु त्याच्यापेक्षाही अनंत पटीने श्रेष्ठ असा परमात्मा आहे. तो भूतमात्राच्या सर्व ठिकाणी विराजमान आहे. ईश्वराला न मानणारे बुद्ध, महावीर, संत गाडगे महाराज यांना लोक भगवान मानतात. हे मानव कुळाला अधिकार संपन्नतेने मार्गदर्शन करणारे प्रति परमेश्वरच होते.''

बाबा कीर्तनातून, प्रवचनातून सांगायचे, ''जीवन सद्मार्गाने जगणे हीच मोठी तपश्चर्या आहे. चांगले सद्मार्गी जीवन जगताना दररोज अडचणी आहेत. प्रपंचातील अडसर आहेत. अडथळे आहेत. दररोज अनेकांच्याकडून प्रतिकूल प्रहार सोसावे लागतात. आजारपण येते. व्यवहारी अडचणी उद्‌भवतात. पावलोपावली संकटे येतात. यांना अविरतपणे, बेडरपणे तोंड देतो तो खरा तपस्वी. जीवन म्हणजे फुलाफुलांची गादी नव्हे, ते नाना समस्यांचे कुरुक्षेत्र आहे. जो नाउमेद होत नाही, पोलादाच्या कणखरपणे तो संसारात राहून आनंदाने लढत असतो तो तपस्वी असतो. तो संसारी योगी असतो.''

स्वाध्यायी माणसाबद्दल ते सांगायचे, ''स्वाध्यायी म्हणजे ग्रंथ वाचून, तोंडपाठ करून त्याचे परिशिलन करणे नव्हे. जो रोजच्या जगण्यात अभ्यासपूर्वक धोरण आखतो, योग्य निर्णय घेतो, योग्य दिशेनेच पाऊल उचलतो, काय चांगले, काय वाईट हे ज्याला अंतर्यामी उमजते तो स्वाध्यायी असतो.''

जिजाबा महाराजांनी गीतेपासून गीतांजलीपर्यंत, ज्ञानेश्वरीपासून तुकाराम गाथापर्यंत सकळ संतांच्या ग्रंथापासून शीख धर्माच्या ग्रंथ साहेबापर्यंत सर्व ग्रंथ अभ्यासले होते. त्यांचे नित्य वाचन, मनन, चिंतन केलेले होते. संतश्रेष्ठ गाडगे महाराजांच्या सोबत राहून आत्मा, परमात्मा आणि मानवतेचा अभ्यास सहजी घडला होता. अशा थोर विभुतीला स्वार्थाचा, प्रसिद्धीचा अवगुणांचा स्पर्श होईलच कसा? संसारी जीवन जगूनही ते योग्यासारखे साधक, अभ्यासक, मुमूक्षू, जिज्ञासू आणि तरीही दैवी गुण संपदेने परिपूर्ण राहिले. निःस्वार्थी राहिले.

अशा थोर देशभक्ताची माहिती आपण वाचणार आहोत. ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभाग घेतला. ब्रिटिश सरकारने त्यांना अनेक वेळा पकडले. तुरुंगात डांबले. पण देशभक्त जिजाबा महाराज थांबले नाहीत. त्यांनी आपला लढा तीव्र केला. देशाच्या स्वातंत्र्यानंतरही सामान्य लाकांना त्यांचे हक्क मिळावेत म्हणून महाराजांनी संप, मोर्चे, आंदोलने उभारली. आपल्या सरकारने त्यांना पुन्हा पकडले. तुरुंगात डांबले. जिजाबा महाराज घाबरले नाहीत. स्वातंत्र्यानंतर

# प्रकरण पहिले

देशभक्त जिजाबा महाराज, सोहोलीकर-मोहिते (पाटील) म्हणजे संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांचे पट्टशिष्य. महात्मा गांधीजी, विनोबाजी भावे यांच्यासारखे अहिंसेचे पुजारी. फक्त कर्म श्रेष्ठ, बाकी सर्व शून्य मानणारे योगी. सर्वजण त्यांना 'बाबा' म्हणत. ते योग्यासारखे नि:संग, विरक्त, सदाचरण हीच संपत्ती मानणारे. तरीही महात्मा गांधी, क्रांतिसिंह नाना पाटील, संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांना मार्गदर्शक मानून देशसेवा म्हणजे देशातील माणसांची सेवा हाच धर्म मानणारे श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व होते. जिजाबा मोहिते-पाटील म्हणजे संतोषाची मूर्ती होते. एका कणाचीसुद्धा मलीनता त्यांच्या वृत्तीत नव्हती. आचार, विचार आणि उच्चार यात शुद्धता होती. अभद्र, अमंगल, अशुभ, राग, द्वेष या गोष्टींपासून ते फार दूर होते.

जिजाबा मोहिते-पाटील म्हणजे जिजाबा महाराज (बाबा) म्हणजे आनंदाची मूर्ती होते. वृत्तीची प्रसन्नता पाहावी ती त्यांच्याकडे. कसलीही आणि कोणतीही रुखरुख त्यांच्याजवळ नव्हती. कशाची हाव त्यांनी केली नाही. (स्वातंत्र्यसेनानी असून सुद्धा स्वातंत्र्यसैनिकांना मिळणारी पेन्शन त्यांनी घेतली नाही.) जय आणि पराजय, फायदा आणि तोटा याचा त्यांनी समचित्ताने स्वीकार केला. त्यांचे मन सदैव निरागस बालकासारखे टवटवीत होते. उमललेल्या गुलाबाच्या सुंदर देखण्या रूपासारखे ते सदैव आनंदी असायचे. रुसणे त्यांना ठाऊक नव्हते. हिरमुसलेपणा त्यांच्या कोशात नव्हता. रागावणे, चवताळणे ते विसरले होते. पौर्णिमेच्या स्वच्छ, निरभ्र चांदण्यासारखे त्यांचे जीवन होते. सदैव, आनंदी, संतोषी, चैतन्यमय आणि प्रेरणादायी.

संत गाडगे महाराजांच्या कार्यात त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. परंतु त्याचा ऊहापोह नाही. प्रसिद्धी नाही. मी माझा देव, माझा धर्म, माझा देश आणि माझे देशबांधव यांच्यासाठी कार्य करतोय. त्याची प्रसिद्धी कशाला ही भावना मनी जीवनभर बाळगली.

ते भगवद्गीतेतील योग्यासारखे नि:संग राहिले. समाजात असूनही विरक्त भावनेने ते जगले. सदाचरण, रसाळवाणी, येणाऱ्या-भेटणाऱ्या बरोबर अत्यंत